ऐक्य

# केबीपी कॉलेजच्या विद्यार्थ्यांची सायबर सुरक्षाविषयी जनजागृती

▲ **सातारा,** दि. ६ : कर्मवीर भाऊराव पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च, सातारा येथील BCA विभागातील विद्यार्थ्यांनी महाराजा सयाजीराव विद्यालय, सातारा येथे 'सायबर सुरक्षा' या विषयावर प्रबोधनात्मक सादरीकरण केले. हा उपक्रम केबीपी कॉलेज, सातारा व Quick Heal Foundation यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आला.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांना सायबर गुन्हे आणि त्यांचे प्रकार, सोशल मीडियावरील धोके, सुरक्षित पासवर्ड तयार करण्याचे मार्ग, फिशिंग व फेक लिंकपासून बचाव, ओटीपी व डिजिटल व्यवहारातील सुरक्षितता तसेच सायबर बुलिंग आणि त्यावरील प्रतिबंधक उपाय याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली.

कार्यक्रमात शैक्षणिक व्हिडिओ, स्लाइड्स,



**कार्यक्रमात सहभागी झालेली केबीपी कॉलेजचे विद्यार्थी.**

सजगतेचे महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यात आले. या उपक्रमाचे संचालन प्रा. प्रियांका लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार

फिल्ड ऑफिसर विक्रांत मापुस्कर उपस्थित होते. कार्यक्रमास महाविद्यालयाचे संचालक डॉ. बी.एस. सावंत व संगणक विभाग प्रमुख डॉ. आर.डी. कुंभार यांचे सहकार्य लाभले.